अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०५/ २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १० -०९-२०१२.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ०५ , दिनांक १४-०९-२०१२.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा शुक्रवार दिनांक १४-०९-२०१२ रोजी दुपारी ३-०० वाजता माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात "** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०५ शुक्रवार दिनांक १४ / ०९ /२०१२ रोजी दुपारी ३-०० वाजता होणा-या
मा.खास सभेची विषय पत्रिका.

---*---

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने चारा डेपो अगर जनावरांच्या छावण्या सुरु करणे बाबत मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अनिल बोरुडे, मा.श्री.नितीन जगताप यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजीचे पत्र तसेच मा.श्री. शिवाजी लोंढे व मा.श्री. अनिल लोखंडे नगरसेवक यांचे पत्र व त्यावरील ऑफिस प्रस्ताव. |
| २८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १० / ०९ /२०१२.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : २७** **दिनांक : १४/०९/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने चारा डेपो अगर जनावरांच्या छावण्या सुरु करणे बाबत मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, सभापती स्थायी समिती, मा.श्री.अनिल बोरुडे, मा.श्री.नितीन जगताप यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजीचे पत्र तसेच मा.श्री. शिवाजी लोंढे व मा.श्री. अनिल लोखंडे नगरसेवक यांचे पत्र व त्यावरील ऑफिस प्रस्ताव.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, मा.श्री.अनिल बोरुडे, मा.श्री.नितीन जगताप यांनी दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या पत्रान्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील जनावरांच्या छावण्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने महानगरपालिका हद्दीमध्ये सुरु करणे बाबतचा प्रस्ताव महानगरपालिका विशेष सभेमध्ये घेवुन निर्णय घेणे बाबत कळविले. त्यानुसार मा.महापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ५७९ दिनांक २९/०८/२०१२ अन्वये मा.आयुक्त यांना महानगरपालिका हद्दीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने जनावरांच्या छावण्या सुरु करणे बाबतचा प्रस्ताव सादर करणे बाबत कळविले आहे. तसेच श्री.प्रकाश भागानगरे व इतर ११ नागरिकांचे निवेदन प्राप्त झालेले आहे. तसेच श्री.शिवाजी लोंढे व श्री.अनिल लोखंडे मा.नगरसेवक यांची यादी.

मा.महापौर यांनी मा.जिल्हाधिकारी यांना महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने चारा डेपो अगर जनावरांच्या छावण्या तात्काळ सुरु करणे बाबत महापौर कार्यालय पत्र क्र.५७३ दिनांक २७/०८/२०१२ अन्वये कळविलेले आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडील टंचाई शाखेमध्ये समक्ष चौकशी केली असता मा.महापौर यांचे पत्रानुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे असे समक्ष चौकशी अंती मा.श्री.गाडीलकर साहेब, उपजिल्हाधिकारी टंचाई शाखा यांनी सांगितले.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये केडगांव, बोल्हेगांव, नागापूर, सावेडी, भिस्तबाग इत्यादी उपनगरामध्ये शेतकरी यांचेकडेस गायी, बैल, म्हैस इत्यादी जनावरे आहेत. तसेच शहरातील गवळी यांचेकडेस सुध्दा जनावरे आहेत. अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जनावरांची छावणी सुरु करणेसाठी महानगरपालिका महासभेने मंजुरी दिल्यानंतर सदरचा ठराव टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडेस पाठविणेस मान्यतेस्तव सादर.

तरी सदरचा प्रस्ताव महासभेमध्ये घेणेसाठी नगरसचिव विभागाकडे पाठविणेंस सादर.

यावर वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे सदरील विषया संदर्भात मा.महापौर यांचेकडे निर्णयास्तव पाठविणेस हरकत नाही तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा आदेश की, मा.स्थायी समिती सदस्य यांचे मागणी पाहता मा.विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०९/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता बोलाविण्यांत यावी.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), वैद्यकीय अधिकारी यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** उपलब्ध जनावरांच्या आकडे वारीत तफावत आढळते. बोल्हेगांव, केडगांव, येथील माहिती संकलीत करावी. दिनांक १६/०८/२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी यांना पत्र दिले. मी नियोजन भवनातील बैठकीत हा विषय मांडला व मा.पालकमंत्री यांनी त्यास सहमती दर्शविली. ठराव मिळाला की छावणी, चारा डेपो होवू शकतो असे अश्वासन त्यांनी दिले. १८ दिवसानंतर हा विषय प्रशासनाकडून सादर झालेला आहे. तीन दिवसात ठराव करु असे अश्वासन मा.उपायुक्त व मा.उपमहापौरांनी आमच्या रस्ता रोको प्रसंगी आश्वासन दिले. या विलंबाला कोण जबाबदार. विषय त्वरीत मंजूर करावा.

**मा.आयुक्त सो :-** चारा डेपो करण्यासाठी विरोध नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ठराव करायची गरज नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** विषय मंजूर करावा.

**मा.श्री.निखिल वारे :-** रोजगार योजना हमीचा देखील विषय घेण्यात यावा.

**मा.महापौर :-** मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडेस प्रस्ताव पाठविणेत येईल. प्रस्ताव मंजूर.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने चारा डेपो अगर जनावरांच्या छावण्या सुरु करणेच्या ऑफिस प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. सदर ठरावासह संपुर्ण प्रकरण मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेंत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते,

अनुमोदक : मा.श्री. शिवाजी बाळासाहेब लोंढे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
सार्वजनिक आरोग्य विभाग.
दिनांक :        /        /२०१२.

## अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पशुधन गणना सन २००७ सावेडी, केडगांव, बोल्हेगांव, नवनागापुर, बुरुडगांव

१) गाय :-

| देशी | दुभत्या | इतर | एकुण |
|---|---|---|---|
| | २९८ | १७ | ४६५ |
| संकरीत | ४३९ | | ७३३ |

२) म्हशी :-

| गावठी | दुभत्या | इतर | सुधारीत म्हशी | दुभत्या |
|---|---|---|---|---|
| ३८२ | २१८ | २१ | १८९ | १०८ |

३) बैल :- ६३२

४) शेळी :- २७२०

५) मेंढी :- ११९४

६) घोडे :- ६४

७) कोंबडी :-        देशी - ६०००        सुधारीत - १४९०

मा.सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय, अहमदनगर यांच्याकडुन वरील प्रमाणे पशु गणणेची माहिती आज दिनांक ०५/०९/२०१२ रोजी प्राप्त केली आहे.

**जनावरांच्या छावण्या संदर्भात अटी शर्ती :-**

१) तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राशिवाय जनावरांना छावणीत प्रवेश देता येणार नाही. छावणी चालकाने असा प्रवेश दिल्यास सदर जनावरांचे अनुदान छावणी चालकास देय राहणार नाही.

२) जनावरांच्या छावणीत दाखल जनावरास प्रतिदिन मोठया जनावरास रु.८०/- व लहान जनावरास रु.४०/- अथवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने संस्था चालकास अदा करण्यांत येतील.

३) जनावरांच्या छावणीतील जनावरांसाठी पाणी व सावलीसाठी शेड उपलब्ध करावे लागेल.

४) ओला चारा मोठे जनावरांस १५ किलो ग्रॅम व लहान जनावरास ७.५ किलो ग्रॅम अथवा वाळलेला चारा मोठया जनावरास ६ किलो ग्रॅम व लहान जनावरास ३ किलो ग्रॅम प्रतिदिन या प्रमाणे छावणीतील जनावरास चारा पुरवावा लागेल.

५) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र.वैवि/अ-२७(१७)/१२२५-१३६५/२००८/पसं-१४ दि.०६/०८/२००८ नुसार मोठया जनावरांसाठी प्रतिदिन १.०० किलो आणि लहान जनावरांसाठी प्रतिदिन ०.५ किलो याप्रमाणे पशुखाद्य द्यावे लागेल. तसेच खनिज मिश्रण (आय एस आय प्रमाणित) अ) ऊस किंवा ऊसाचे वाढे यांचे सोबत मोठया जनावरांसाठी प्रतिदिन ५० ग्रॅम आणि लहान जनावरांसाठी २५ ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे लागेल. ब) इतर वैरणीकरीता मोठया जनावरांसाठी प्रतिदिन ३० ग्रॅम आणि लहान जनावरांसाठी १५ ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे लागेल.

६) पशुसंवर्धन विभागाने चारा तपासणी अंती चारा जर जनावरास खाण्यास योग्य नसल्याचे आढळून आल्यास सदर विभागाने शिफारस केल्यानुसार छावणी चालक संस्थेवर दंडनीय कारवाई करण्यांत येईल.

७) जनावरांची छावणी ही दिनांक ३१/०८/२०१२ पर्यंत अथवा पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध होईपर्यंत जो कालावधी अगोदरचा असेल तोपर्यंत चालू राहील.

८) जनावरांच्या छावणीमध्ये ठेवलेल्या जनावरांचा अपघात/आग लागणे किंवा नैसर्गिक किंवा अनैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू आला तर शेतक-यांस अथवा छावणी चालकास शासनाकडून कुठलीही मदत दिली जाणार नाही.

९) जनावरांच्या छावणी चालकाने लेखी आदेश नसताना छावणी सुरु केल्यास त्याबाबत कुठलाही मोबदला दिला जाणार नाही.

१०)शासनाकडून अनुदान उपलब्ध झाल्यानंतर तहसीलदार अथवा सक्षम अधिकारी यांनी खर्चाच्या रकमा प्रमाणित केल्यानंतर नियमानुसार अदा करण्यात येईल.

११) जनावरांच्या छावणीत दाखल असलेल्या लहान व मोठया जनावरांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यात रोजच्या रोज नोंदी अद्यावत ठेवाव्या लागतील. तहसीलदार अथवा सक्षम अधिकारी यांचेकडून सदरची नोंदवही प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील जनावरांच्या अवास्तव नोंदी आढळून आल्यास छावणी चालू झाल्याच्या दिनांकापासून दंडनीय कारवाई करण्यांत येईल. तसेच छावणी बंद करण्याचे आदेश दिले जातील.

१२) प्रचलित शासकीय निर्णयात होणारे बदल छावणी चालक संस्थेवर बंधनकारक राहिल.

१३) छावणी चालक संस्थेस आगाउ रक्कम मागता येणार नाही.

१४) छावणीतील जनावरांचे शेणखत छावणी चालक संस्थेने विक्री केले असलयास शेणखत विक्रीची रक्कम देयकातून वजा करण्यात येईल. छावणी चालकाने जनावराच्या शेणखताचा हिशोब स्वतंत्र वहीत नोंदवावा.

१५) छावणीतील जनावरांना आवश्यक ती औषधे देणे व लसीकरण करणे गरजेचे आहे. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी याबाबतच्या नोंदी छावण्यांना दिलेलया भेटीच्या वेळी घेणे आवश्यक आहे.

१६) शेतीच्या कामासाठी शेतक-यांनी बैलांना ८-१० दिवस घरी नेण्याची परवानगी मागितल्यास ती देण्यात यावी. त्यापेक्षा कमी कालावधीसाठी बैल घरी नेण्याची परवानगी देता येणार नाही, अशी परवानगी संबंधित शेतकरी यांनी तलाठी यांचेकडे मागवावी लागेल. जेवढे बैल बाहेर नेले असतील, तेवढेच बैल काम झालयानंतर छावणीत दाखल करुन घ्यावेत.

१७) शासन निर्णय दिनांक ०३/०१/२०१२ मध्ये नमुद केलेलया अटी शर्ती लागू राहतील.

१८) जनावरांच्या छावणीमध्ये ठेवण्यात येणा-या नोंदवह्यांची तपासणीसाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना नोंदवह्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे छावणी चालकावर बंधनकारक राहील.

१९) छावणीमध्ये जनावरांचे आवक चा-याचे आवक व वाटप, पशुखाद्य, खनिज मिश्रण यांचे आवक व वाटप, चारा कुटी करण्याचे मशीन, पशुवैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या तपासण्या इत्यादी नोंदवह्या ठेवाव्या लागतील.

२०) छावण्याच्या ठिकाणी फलक लावुन त्यावरील माहिती अद्यावत ठेवावी लागेल.

२१) छावणीवर होत असलेल्या खर्चाच्या बाबनिहाय नोंदी बिलासह ठेवाव्या लागतील.

२२) छावणीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे लागेल.

२३) छावणीमध्ये दाखल होणारे लहान व मोठे जनावरांना अनुक्रमांकाचे बिल्ले लावावे लागतील.